02-07-2021-Dai- 03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 07/01/2021 11:21 PM Page 1

निवडक

भंडारी समाजाची ४ रोजी विशेष बैठक

डिचोली, दि. १ (प्रतिनिधी) : डिचोली तालुका भंडारी समाजाची विशेष बैठक दि. ४ जुलै रोजी शांताराम नगर बोर्डे येथील दीनानाथ तारी सभागृहात सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कर्षासाठी आर्थिक मदत करणे, प्रोत्साहन देणे तसेच इतर विषयावर चर्चा पदाधिकारी तसेच नेतेही बैठकीस उपस्थित राहतील. सर्वांनी आवर्जून उपस्थिती लावून सूचना कराव्यात, असे आवाहन अध्यक्ष आनंद नार्वेकर यांनी केले आहे.

नगर वाचनालयाचे उद्या उदघाटन

डिचोली, दि. १ (प्रतिनिधी) : गोवा सरकार कला आणि संस्कृती संचालनालय संस्कृती भवन पाटो पणजी साखळी नगर वाचनालय रवींद्र भवन साखळी गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने नूतन वाचनालयाचे उद्घाटन शनिवार, दि. ३ रोजी सकाळी १० वाजता मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते होणार आहे. साखळी रवींद्र भवन येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे, संजय गिहार, नगराध्यक्ष राया पार्सेकर, उपनगराध्यक्ष राजेश सावळ, विठोबा घाडी यांची उपस्थिती असेल, असे आयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे.

सावईवेरेत ४ रोजी मेळाव्याचे आयोजन

सावईवेरे, दि.१ (प्रतिनिधी) : वळवई, सावईवेरे व वाघुर्मे भंडारी ग्राम समितीतर्फे फोंडा तालुका समितीच्या सहकार्याने भंडारी समाज बांधवांसाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा येत्या रविवार दि. ४ जुलै रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ यावेळेत सावईवेरे येथील ग्रामीण वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे.
या मेळाव्यात समाजबांधवांना प्रमाणपत्रे वितरित केली जाणार असून माहितीसाठी सोमनाथ नाईक (७५०७८०१००६) किंवा प्रकाश नाईक (९४२२४४५४३५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन फोंडा तालुका समितीचे सचिव हेमंत नाईक यांनी केले आहे. कोविडच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून हा मेळावा होणार आहे

फोंड्यातून उमेदवारीसाठी दावेदारी करणार

काँग्रेस सरचिटणीस जॉन परेरांची माहिती : पक्षश्रेष्ठांनी विचार करावा

फोंडा, दि. १ (प्रतिनिधी) :

फोंडा मतदारसंघाचे आमदार रवी नाईक यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मडकई किंवा अन्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे फोंडा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार म्हणून आपण दावेदारी करणार असल्याची माहिती फोंडा काँग्रेस गट समितीचे माजी अध्यक्ष तथा दक्षिण गोवा काँग्रेस समितीचे सरचिटणीस जॉन परेरा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेत समितीचे अध्यक्ष अरुण गुडेकर, किशोर नाईक, आचल वेरेकर, रसिक पारकर, दिलीप नाईक, शब्बीर शेख व सदानंद काणेकर उपस्थित होते.

फोंडा मतदारसंघात १९९२ पासून आपण काँग्रेसचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून परिचित आहे. यदाकदाचित विद्यमान आमदार नाईक यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत फोंडा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास माघार घेतल्यास काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी आपला विचार करण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी लवकरच फोंडा गट काँग्रेस समितीतर्फे पक्ष श्रेष्ठींना कळविण्यात येणार आहे. पक्षात नवीन प्रवेश केलेले व्यक्ती उमेदवारीसाठी दावा करीत असल्याचे प्रसारमाध्यमातून दिसून येत आहे. मात्र, निष्ठावंत कार्यकर्त्याला डावलून नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्यास समितीला वेगळा विचार करावा लागणार असल्याचे परेरा यांनी सांगितले.

फोंडा गट काँग्रेस समितीचे अध्यक्ष अरुण गुडेकर यांनी विद्यमान आमदार नाईक यांच्यानंतर फोंडा मतदारसंघात परेरा हे निष्ठावंत व ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत. त्यामुळे पक्ष श्रेष्ठींनी परेरा यांना फोंडा मतदारसंघात काँग्रेस पक्षाचा उमेदवार देण्याची गरज असल्याचे सांगितले.

फोंडा : पत्रकार परिषदेत माहिती देताना जॉन परेरा. बाजूला अरुण गुडेकर सोबत इतर. (स्वप्नेश च्यारी)

जबाबदारी दिल्यास समर्थपणे पेलण्यास तयार : लोबो

म्हापसा, दि. १ (प्रतिनिधी) :

नवीन पक्ष काढण्याचा अद्याप काही विचार नाही आणि आपण पक्ष सोडणार ही कोणीतरी पसरवलेली अफवा आहे. आपण स्वतःला नेता समजत नाही पण जनतेची कामे करीत
राहतो. पक्षाने बार्देशची जबाबदारी दिल्यास समर्थपणे पेलण्यास तयार आहे, अशी प्रतिक्रिया घनकचरा व्यवस्थापन मंत्री मायकल लोबो यांनी दिली.

काणका येथे कळंगुट म्हापशाच्या रस्ता रुंदीकरण कामाची पहाणी केल्यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते. वेर्ला काणकाच्या सरपंच अमिता कोरगावकर व इतर पंचसदस्य, उत्तर गोवा जिल्हा पंचायत अध्यक्ष कार्तिक कुडणेकर, माजी जिल्हा पंचायतसदस्य मनोज कोरगावकर उपस्थित होते.

म्हापसा ते कळंगुट रस्ता रुंदीकरणाचे काम दोन वर्षांपूर्वी हाती घेण्यात आले होते.

काणकोण : मासळी मार्केटजवळ उभारण्यात आलेला बेकायदेशीर गाडा हटविण्यात आला. (संतोष गावकर)

काणकोण मासळी मार्केटजवळील बेकायदा गाडे हटविले

काणकोण, दि. १ (प्रतिनिधी) :

काणकोण मासळी मार्केटजवळ एका रात्रीत उभारण्यात आलेले दोन बेकायदेशीर गाडे काणकोण पालिकेने आज गुरूवारी पोकलीनच्या सहाय्याने पाडले. गाडे उभारलेली व्यक्ती त्या ठिकाणी दावा करण्यासाठी फिरकलीही नाही.

काणकोण पालिकेच्या भाजी आणि मासळी मार्केटच्या मोकळ्या जागेवर गेल्या सोमवारी रातोरात दोन गाडे पत्राचा वापर करून एकमेकांना लागून उभारण्यात आले होते. या प्रकाराने खडबडून जागे झालेल्या काणकोण पालिका प्रशासनाने चावडी बाजारात ज्या– ज्या ठिकाणी अशाप्रकारे हातगाडे उभारण्यात आले आहेत, त्या सर्वांचे सर्वेक्षण केल्यावर बेकायदेशीर गाडे काढण्याची सूचना काणकोण पालिकेचे मुख्याधिकारी उदय प्रभुदेसाई यांनी आज संबंधित हातगाडेधारकांना केली. त्यानुसार बहुतेक हातगाडे आज संध्याकाळी स्वतःहून हटविण्यात आले.

साल्वादोर दु मुंदच्या सरपंच, उपसरपंचांचे राजीनामे सादर

▶ पाठिंबा काढून घेतलेल्या पंचा नी अविश्वास ठराव

बिठ्ठोण, दि. १ (वार्ताहर) :

गेल्या आठवड्यात पर्वरी मतदारसंघातील साल्वादोर दु मुंद पंचायतीतील नाट्यमय सत्तांतरानंतर पंचायतीचे सरपंच संदीप साळगावकर आणि उपसरपंच रिना फर्नांडिस यांनी पंचायत संचालक सिद्धी हळर्णकर गुरुवारी आपले राजीनामे सुपूर्द केले. याबद्दल साळगावकर यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. गेल्या दि. २५ जून रोजी साल्वादोर दु मुंद पंचायतीमधील नऊपैकी पाच पंचसदस्यांनी साळगावकर यांचा पाठिंबा काढून घेऊन

भाजपाच्या गोटात ते शिरले होते. यामध्ये विजय चोडणकर, सुवर्णलता

पार्सेकर, अंतोनिओ फर्नांडिस, रोशनी सावईकर आणि भगवान नाईक यांचा समावेश आहे. आता त्याच सदस्यांनी सरपंच साळगावकर

यांच्याविरुद्ध दि.२५ जून रोजी अविश्वासाचा ठराव आणला असून त्या ठरावात त्यांनी व्यवस्थित काम करीत नसल्याचा आरोप ठेवण्यात

आला आहे. यावर साळगावकर यांनी सांगितले की, जर मी काम

केले नाही तर पंचायतघर बहुउद्देशीय क्रीडा मैदान कसे तयार झाले. आमदार रोहन खंवटे यांच्या सहकार्याने अनेक विकासकामे केली

आहेत. मला सत्तेची हाव नाही. जर मला सांगितले असते तर मी

सरपंचपद सोडले असते. परंतु आकस्मिकपणे पाठिंबा काढून

भाजपच्या कळपात गेले. गेलेल्या पाच पंचसदस्यांपैकी एका महिला पंचसदस्याचा पती माजी सरपंच होता. त्याने सध्या एका संडासाचे बांधकाम केले नाही. परवापासून मतदारसंघातील खेळाडूंना मैदान खुले करून देण्यात आले आहे. माझ्या सरपंचाच्या कारकिर्दीत केलेल्या कामाबद्दल मी खूश आहे. परंतु, अचानक माझ्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणल्याबद्दल मला खंत वाटते, असे साळगावकर यांनी सांगितले.

पर्वरी : संचालकांकडे राजीनामा सादर करताना सरपंच संदीप साळगावकर आणि उपसरपंच रिना फर्नांडिस. (शेखर वायंगणकर)

बाणस्तारी मार्केट प्रकल्पाचे काम बेकायदा

▶ पंचायतीकडे कोणतीच कागदपत्रे नसल्याचा दामोदर नाईक यांचा दावा

फोंडा, दि. १ (प्रतिनिधी) :

बाणस्तारी येथील मार्केट प्रकल्पाला कुणाचाच विरोध नाही. फक्त जागेच्या मालकांना योग्य मोबदला मिळावा तसेच पालखीची संस्कृती जपून प्रकल्प उभारण्याची सूचना नाईक गावकर कुटुंबीयांनी केली होती. परंतु जागेचा मोबदला मिळविण्यासाठी नाईक कुटुंबीयांना न्यायालयात याचिका दाखल करण्याची वेळ आली. प्रकल्पासंबंधी भोम–अडकोण पंचायतीकडे कोणतीच कागदपत्रे नसल्याने प्रकल्पाचे बेकायदेशीरपणे काम सुरू असल्याचे मत पंचसदस्य दामोदर नाईक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

येथे आज गुरुवारी संध्याकाळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत पंचसदस्य विश्वजित नाईक उपस्थित होते.

बाणस्तारी येथे मार्केट प्रकल्प उभारण्यासाठी १० वर्षांपूर्वी आपणासह विद्यमान सरपंच सुनील जल्मी व तत्कालीन आमदार दीपक ढवळीकर प्रयत्न करीत होते. जागेचा प्रश्न सोडविण्यात अनेक वर्षे गेली. मात्र, २०१७ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत गोविंद गावडे निवडून आले. त्यावेळी त्यांनी अनुसूचित जमाती खात्याच्या निधीचा वापर करून प्रकल्प उभारण्याचे काम सुरू केले. त्यामुळे प्रकल्पाचे श्रेय मंत्री गोविंद गावडे व माजी आमदार दीपक ढवळीकर यांना जाते. परंतु २ दिवसांपूर्वी सरपंच सुनील जल्मी यांनी पत्रकार परिषद घेऊन आमदार सुदिन ढवळीकर बद्दल भाष्य केले. आमदार ढवळीकर यांनी सुद्धा प्रकल्पाला विरोध केला नाही. फक्त प्रकल्पासाठी अनुसूचित जमाती खात्याचा निधीचा वापर करणे चुकीचे असल्याचे म्हटले होते. त्यात काहीच गैर नव्हते असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले.

पंचसदस्य विश्वजित नाईक यांनी सरपंच सुनील जल्मी यांनी पत्रकार परिषद घेऊन मगोचे नेते तथा आमदार ढवळीकर यांच्यावर केलेल्या आरोपाचे खंडन करीत असल्याचे सांगितले.

फोंडा : पत्रकार परिषदेत माहिती देताना पंचसदस्य दामोदर नाईक व विश्वजित नाईक. (स्वप्नेश च्यारी)

NOTICE

My Husband **Late Baltazar Andrade** was owning a **Honda Activa SCV110D Scooter** Reg. No. **GA-06-J 6477.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco,** or to me **within 15 days** time from today.

Date: 01/07/2021 Sd/-
Mrs. Santana Andrade
H. No. 226, Vollant, Vasco Da Gama, Mormugao, Goa 403802.
Sandeep Ads

कोदाळ, देरोडे भागांत लवकरच टॉवरची उभारणी

▶ मंत्री विश्वजित राणे यांची माहिती : मुख्यमंत्री नेटवर्कबाबत गंभीर

वाळपई, दि. १ (प्रतिनिधी) :

सत्तरी तालुक्याच्या जवळपास सर्वच भागांमध्ये मोबाईल नेटवर्कची समस्या आहे. यामुळे मुलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे ही खरी वस्तुस्थिती आहे. यामुळे येणाऱ्या काळात याबाबतची कैफियत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासमोर मांडण्यात येणार आहे. साट्रे, देरोडे, व कोदाळ या भागातील विद्यार्थ्यांसाठी नेटवर्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दहा दिवसांत जिओ कंपनीचा टॉवर उभारण्याचे काम सुरू होणार असल्याची माहिती स्थानिक आमदार तथा आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी दिली आहे.

नगरगाव पंचायत क्षेत्रातील साट्रे, कोदाळ व दरोडे या गावात नेटवर्कची सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीच्या शिक्षणासाठी नेटवर्कच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. याच्या निषेधार्थ दोन दिवसांपूर्वी सदर भागातील जवळपास तीस विद्यार्थ्यांनी वाळपईच्या बीएसएनएल कार्यालयावर धडक देऊन आपला संताप व्यक्त केला होता. त्याचप्रमाणे दोन दिवसांत नेटवर्कची सुविधा उपलब्ध न झाल्यास ग्रामस्थांसह मोर्चा कार्यालयावर नेण्याचा इशारा दिला होता. याबाबत मंत्री विश्वजित राणे यांनी सांगितले की, सदर भागांमध्ये जिओ नेटवर्कचा टॉवर उभारण्याचे आदेश आपण दिलेले आहेत. यासंदर्भातील महत्त्वाची बैठक पुढच्या आठवड्यामध्ये घेण्यात येणार आहे. येत्या दहा दिवसांत टॉवर उभारण्याच्या कामाला सुरुवात होणार असल्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. नेटवर्कची सुविधा संपूर्ण गोव्यामध्ये आहे. याबाबत मुख्यमंत्री गंभीर असून ते उपाययोजना करणार येणार आहेत.

पंचसदस्यांनी माहिती दिलीच नाही

सदर गावांमध्ये नेटवर्कची गंभीर समस्या आहे. याबाबतची माहिती स्थानिक पंचसदस्यांनी देणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाही. यामुळे याप्रकारची गैरसोय निर्माण झाल्याचे मंत्री राणे यांनी यावेळी स्पष्ट केले. येणाऱ्या आठवड्यात जिओ कंपनीच्या अधिकाऱ्यांची व स्थानिक भागातील सक्रिय तरुणांची एक महत्त्वाची बैठक बोलावून त्यामध्ये नेटवर्कची सुविधा याबाबत निश्चित प्रमाणात उपाययोजना काढण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुर्ला याठिकाणी निर्माण झालेली नेटवर्कच्या सुविधेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की सदर ठिकाणी जिओ टॉवर उभारण्यासाठी आपण महत्त्वाचे योगदान दिले होते. आता येणारा काळात सदर टॉवर लवकरात लवकर सुरू व्हावा, यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

सरकारी कार्यालयांनाही घरपट्टी ?

▶ मनपा बैठकीत प्रस्ताव : सर्वेक्षण सुरू

पणजी, दि. १ (प्रतिनिधी) :

राजधानी पणजीत मोठ्या प्रमाणात असलेल्या सरकारी कार्यालयांना घरपट्टी लागू करण्याचा प्रस्ताव पणजी महानगरपालिकेचा आहे. यासाठी सरकारी कार्यालयांचे सर्वेक्षणाचे काम लवकर पूर्ण करण्याचे ठरल्याचे सूत्रांनी सांगितले. यासंबंधी प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी शुक्रवारी मनपा बैठक घेण्यात येणार आहे.

पणजी मनपाच्या अधिकार क्षेत्रात केंद्र तसेच राज्य सरकारची विविध कार्यालये आहेत. या कार्यालयांना घरपट्टी अथवा कचरा शुल्क अजूनही लागू करण्यात आले नव्हते. यासाठी शहरातील सरकारी कार्यालयांचे सर्वेक्षणाचे काम मनपाकडून हाती घेतले जाणार आहे. त्यासंबंधी निविदाही दिली जाणार आहे.

दरम्यान, महापालिकेत गेली सात ते आठ वर्षे कंत्राटावर काम करणाऱ्या सुमारे १५ कंत्राटी कर्मचाऱ्यांना १ जुलैपासून कामावर न येण्याचा आदेश मनपा आयुक्त आग्नेल फर्नांडिस यांनी काढला आहे. कोरोनाच्या काळात रोजगार मिळणे कठीण असल्याने सदर आदेश रद्द करावा, अशी मागणी महापौर आणि आयुक्तांना करण्यात आली आहे.

मनपाच्या सकाळी ११ वाजता होणाऱ्या बैठकीत या विषयावर चर्चा होणार आहे. हे कर्मचारी मनपातील लेखा व कर विभागात काम करत असून त्यांना दर सहा महिन्यांनी कंत्राटाचे नूतनीकरण केले जाऊन मुदतवाढ दिली जात असे. मात्र अचानक जून महिन्याच्या शेवटच्या दिवशी, ३० जून रोजी या कर्मचाऱ्यांच्या हातात जुलैपासून कामावर येण्याची गरज नसल्याचे पत्र देण्यात आले आहे.

नं. / आरएनडी / वर्क / पी / टेंडर / २१–२१ / २६४
गोवा सरकार.
नदी परिवहन खाते,
बेती–गोवा.
दिनांकित : – ३० / ०६ / २०२१

शुद्धिपत्रक–१

संदर्भ : – निविदा सूचना : – नं. आरएनडी / वर्क / पी / टेंडर / २१–२२ / १८८ दिनांकित ०८ / ०६ / २०२१.

विविध फेरी बोटी मार्गावर आवश्यक त्या सॉफ्टवेअरसह तिकिट मशीचा पुरवठा करणे या निविदेतील निविदा अर्ज विक्रीची शेवटची तारीख. आता ती तारीख १९ / ०७ / २०२१ रोजीपर्यंत पुढे ढकललण्यात आली आहे. तसेच निविदा २० / ०७ / २०२१ रोजी दुपारी १५.०० वाजता कॅप्टन ऑफ पार्टस्च्या कार्यालयात उघडण्यात येतील.

बोलीदारांनी पूर्ण भरलेले आपले निविदा अर्ज नदी परिवहन खाते, बेती, गोवा येथील कार्यालयात ठेवलेल्या निविदा बॉक्समध्ये दि. १९ / ०७ / २०२१ रोजी दुपारी १२.३० पर्यंत टाकावेत.

डीआय / एडीव्हीटी / ४२५ / २०२१

मास्क परिधान करा, सामाजिक अंतर राखा, हात जंतूविरहित करा

NOTICE

My Husband **Late Uday V. Haldankar** was owning a **Maruti Omni E MPI Car** Reg. No. **GA-04-C-0844.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Bicholim,** or to me **within 15 days** time from today.

Date: 01/07/2021 Sd/-
Smt. Vasanti Uday Haldankar
H. No. 27, Poira, Bardez, North Goa 403503
Sandeep Ads

BEFORE THE JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA

Mutation Case No. 77189 / Village Verla

1. Chamansab Buddesab Navgi, r/o H. No. 195/3, Canca Verla, Bardez, Goa 2. Mohammed Salim Bateri, r/o H. No. 384, Ganganagar, Khorlim, Mapusa, Goa .....Applicants

V/s

1. Wilfred Olaf F. Stevens alias Wilfred Olaf Fernandes Stevens 2. Philomena Cardoz e D'Sa alias Philomena Jack Dsa 3. Dipali Laxmikant Bicholkar 4. Elvis D Sa alias Elvis Joaquim D'Sa 5. Especiosa Sebastiana Pinto E Desa alias Especiosa Dsa 6. Francisco Keith D'Souza alias Franco D'Souza or Franco Louis D'Souza 7. Guilhermina Fernandes e D'Sa 8. Jennifer Tereza Mabel D Sa E Stevens alias Jennifer Stevens 9. Jerome Manuel Agnelo D'Sa alias Jerry Louis D'Sa or Jerry L. D Sa 10. Joaquim Maria Miguel D'Sa alias Jack Michael D'Sa or Jack D'Sa 11. Joseph D Sa alias Joseph Milton D' Sa 12. Laxmikant Hari Bicholkar 13. Maria Julieta Filomena D'Sa e D'Souza alias Juliet D Souza 14. Monica D Sa alias Monica Luiza Coutinho e D'Sa ....Opponents

PUBLIC NOTICE

Whereas the applicant Chamansab Buddesab Navgi, r/o H. No. 195/3, Canca Verla, Bardez, Goa and Mohammed Salim Bateri, r/o H. No. 384, Ganganagar, Khorlim, Mapusa, Goa, has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include their names in occupants column under Sy. No. 95/1 of Village Verla, Taluka Bardez, as the applicants have acquired right in plot no. 1 admeasuring an area of 292 sq. mts. as per Deed of Sale regd. under no. BRZ-BK1-04796-2016 CD No. BRZD783 dated 22/11/2016 executed before Sub registrar Bardez, Goa. Applicant have also placed on record Deed of Sale regd. under no. BRZ-BK1-02874-2014 CD No. BRZD694 dated 27/06/2014 executed before Sub Registrar Bardez, Goa.

And whereas the notices in Form No. X were served to all the parties by registered A.D. However some of the notices could not be served and returned unserved with postal remark "Insufficient Address, Party Expired, Party Unknown, Party Left and Party out of station" etc. The applicant has submitted that they are not aware about correct addresses of opponents and legal heirs of the deceased opponent if any and prayed to serve the notice by way of publication in local local newspaper.

And whereas the applicant have prayed vide their the application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicants does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Place: Mapusa. Date: 23.06.2021 (Seal)
Sd/- (Maria Gladys Cynthia Gomes)
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka, Bardez, Goa

चुकीच्या अहवालामुळे महिलेचा 'गृहआधार' बंद

▶ किरणपाणी येथील प्रकार : समाजकल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांचा गलथानपणा

मांद्रे, दि. १ (वार्ताहर) :

समाजकल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांच्या चुकीच्या अहवालामुळे पालये किरणपाणी येथील संजना पालयेकर (४०) या महिलेची गृहआधार योजना दोन वर्षांपासून बंदच आहे. मिळालेल्या माहितीनुसार ही महिला सरकारच्या गृहआधार योजनेची गेल्या पाच वर्षांपासून लाभार्थी आहे. साधारणतः गेल्या दोन वर्षांपासून दि. १९ सप्टेंबर २०१९ पर्यंत कोणतेच कारण न देता सदरची चालू स्थितीत असलेली योजनाच संबंधित खात्यातर्फे बंद करण्यात आली.

संजना पालयेकर

त्यानंतर चौकशी करून बंद करण्यात आलेली योजना पूर्ववत चालू करण्यासाठी लाभार्थी महिलेचे पती संजय पालयेकर यांनी स्थानिक आमदाराकडे वारंवार हेलपाटे मारूनही आश्वासनापलीकडे काहीच झाले नसल्याचे लाभार्थी संजना पालयेकर यांनी सांगितले.

दरम्यान, येथील सामाजिक कार्यकर्ते नामदेव तुळस्कर यांनी पणजी येथील समाजकल्याण खात्याच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली असता, योजनार्थी महिला मृत झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्याने तिची योजना बंद केल्याचे कार्यालयातून समजले. त्यासाठी लाभार्थी महिलेच्या निवासस्थानी भेट देऊन एकंदर अहवाल मिळवून तिची बंद असलेली योजना पूर्ववत चालू करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले होते, मात्र अद्याप कोणीही अधिकारी अहवाल मिळवण्यासाठी फिरकले नाहीत नसल्याचे श्री. पालयेकर यांनी सांगितले. संबंधित खात्यातील कामचुकार व निष्काळजी अधिकाऱ्यांमुळे अनेक लाभार्थी शासकीय योजनेपासून वंचित राहत आहेत. संजना पालयेकर या एका पायाने अधू आहेत, शिवाय गरीब परिस्थिती असल्याने तिला गृहआधार योजना आधारवड ठरत होती.

मात्र, संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांच्या चुकीचा फटका तिला बसल्याने मागील दोन वर्षांपासून ती या योजनेपासून वंचित असल्याने संबंधित खात्याने बंद असलेली योजना पूर्ववत चालू करून तिला दिलासा द्यावा, अशी मागणी

श्री. तुळस्कर यांनी केली आहे.

PHOENIX TOWNSHIP LIMITED
CIN-L67190GA1993PLC001327
Regd Off: Durga Bhavan, Hede Centre, Tonca, Panaji- 403001. Goa
Corp Office: Balaji Bhavan, 2nd Floor, 14 Best Marg, Colaba, Mumbai- 400001.
Authorised Capital: 28,00,00,000 Paid-up Capital: 21,68,086,80
AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 31.03.2021

(Rs. In Lacs)

Particulars	3 months ended 31.03.2021 Audited	Corresponding 3 months ended 31.03.2020 Audited	Year to Date figure for Current Year ended 31.03.2021 Audited
Total Income from Operations(Net)	582.591	578.729	979.445
Net Profit/Loss from ordinary Activities after Tax	148.932	28.639	(174.080)
Net Profit/Loss for the period after Tax (after extraordinary Items)	148.932	28.639	(174.080)
Equity Share Capital	1,398.426	1,398.426	1,398.426
Reserves(Excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of Previous Year)	167.803	341.883	167.803
Earning Per Share (before Extraordinary items)	1.065	0.205	(1.245)
Earning Per Share (after Extraordinary items)	1.065	0.205	(1.245)

Note: The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the Stock Exchange websites. (URL of the filings)

For Phoenix Township Limited
Sd/-
Samit Hede
Managing Director
DIN: 01411689

Place: Mumbai
Date: 30.06.2021